तरुण भारत
Purva Vidarbha | 2024-09-20 | Page- 7
epaper.tarunbharat.net

# विद्यार्थ्यांचा सायबर सुरक्षेचा जागर

◆ **भंडारा, १९ सप्टेंबर**

जे. एम. पटेल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सन्मित्र गणेश मंडळाच्या गणेशपूरच्या राजासमोर सायबर सुरक्षेच्या जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम सादर केले.

आज बहुतांश दैनंदिन कामे तंत्रज्ञानाने सुखकर झाले आहेत. परंतु, त्यांच्या फायद्यांबरोबर काही धोकेसुद्धा आहेत. अशा संभाव्य धोक्यांपासून सावध करण्याच्या उद्देशाने जे. एम. पटेल महाविद्यालयाच्या सायबर वॉरिअरतर्फे क्विक हील फाऊंडेशनसोबत सायबर सुरक्षेबाबत समाजातील सर्व घटकांना जागृक करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना सायबर शिक्षित केले जात आहे.

या अनुषंगाने महाविद्यालयातील संगणक विभाग, आयक्यूएसी सेल, एनएसएस सेल, एनसीसी युनिट तसेच क्विक हील फाऊंडेशन आणि सायबर पोलिस भंडाराच्या वतीने गणेशपूरच्या राजा येथे ३० सायबर योद्धांनी विविध कार्यक्रमांद्वारे सायबर सुरक्षेसाठी जनजागृती केली. नृत्याविष्काराद्वारे विद्यार्थ्यांनी सोशल मीडिया आपल्याला कशाप्रकारे बंदिस्त करतो आणि त्यापासून स्वतःचे संरक्षण कसे करू शकतो हे नागरिकांना पटवून दिले.



सायबर सुरक्षेबाबत पथनाट्याद्वारे जनजागृती करताना विद्यार्थिनी

यावेळी उपस्थित जनमाणसांना सायबर योद्धांनी सायबर सुरक्षेची शपथ दिली. या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. विकास ढोमणे, डॉ. कार्तिक पनीकर, डॉ. प्रवीण घोसेकर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी सायबर पोलिस स्टेशनचे अधीक्षक शिंदे, हेडकॉन्स्टेबल दिनेंद्र आंबेदरे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

उपक्रमासाठी सरपंच विद्या मेहर, जिल्हा सामान्य रुग्णालय भंडाराचे समुपदेशक सुरेश ठाकरे, सारथी कल्याणकारी संस्थेचे अशोक डेंगे, महादेव बिसने, सन्मित्र गणेश मंडळ चे अध्यक्ष रूपेश टांगले आदींनी सहकार्य केले. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments